# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०३/०८/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### दुकानातील चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील रामटेक रोड लक्ष्मीनगर मौदा जि नागपुर येथे दिनांक २४/०७/२०२२ चे ०७.०० वा. ते दिनांक ०१/०८/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– छत्रु गोपिचंद दारोडे, वय ५० वर्ष, रा. लक्ष्मीनगर, मौदा जि. नागपुर हे सायकल स्टोर्सला दिनांक २४/०७/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान गावी जान्यापुर्वी कुलुप चेक करून गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा दरवाजे कुलुप तोडुन घरातील सामान अस्त–वयस्त केले. तसेच आरोपीने दुकानाच्या मागील भागातील दरवाजाचा कुलुप तोडुन दुकानामध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानामधील १५० नग सायकलच्या रींग कि. २७,०००/–रू., सायकलचे रेडसन कपंनीचे टयुब ५० नग किं. ३,०००/–रू. मेट्रो कंपनीचे रिक्षा चे टायर कि. १०,४००/–रू., टु व्हीलरेचे एमआरफ चे ८ नग टायर कि. ११,२००/–रू., टुव्हीलर जेके कंपनीचे ३ नग टायर किं. ३,०००/–रू., टुव्हीलर गाडीचे व्हिलपावरचे टयुब ४५ नग कि. ४,५००/–रू. व दिवानातील ८ वापरत्या साडया किंमत २,४००/–रू. असा एकुण कि. ६१,५००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड ८८०५०२७१०२ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील तारसा मौदा येथे दिनांक ०२/०८/२०२२ चे ११.०० वा. सुमारास रविंद्र वैरागडे सांगत आले की, 'ग्रामपंचायत तारसा गोडाम येथे चोरी झाली आहे' फिर्यादी नामे– गोपाल ताराचंद चव्हाण, वय ५२ वर्ष, रा. तारसा ता. मौदा जि. नागपुर यांनी जावुन पाहनी केली असता गावातील आरोपी क्र. १. अर्जुन ज्ञानेश्वर हटवार, वय ३२ वर्ष, रा. तारसा तारसा, जि. मौदा जि. नागपूर व २. रतन मुकुंदाजी गिरी वय २८ वर्ष, रा. तारसा ता. मौदा जि. नागपुर या दोघांना नत्थु हजारे व इतर लोकांनी पकडुन ठेवले होते. आरोपीतांच्या जवळील चुंगळी मध्ये गोडावुन मधिल २५ लोखंडी लॅम्प किंमती ६,०००/–रू. चा मुद्देमाल दिसुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८०, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत मौजा दुधबर्डी शिवार सावनेर येथे दिनांक २७/०७/२०२२ चे १३.०० वा. ते दिनांक २८/०७/२०२२ चे १५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सुखविंदर जनरलसिंग सैनी वय ३२ वर्ष रा. प्लॉट नं. ४४६, हनुमान नगर, एसटी व्यायाम शाळेजवळ हनुमान नगर, नागपुर यांनी सर्वे नं. ३ मौजा दुधबर्डी ता. सावनेर जि. नागपुर येथील कृषी विज्ञान केंद्राचे ५० एकर भिंतीचे कम्पाउंड घेतलेल्या कंत्राटाचे काम सुरू असलेल्या भिंतीचे कम्पाउंडचे ३०,०००/–रू. किमतीचे कम्पाउड उभे असलेले लोखंडी ४६ पोल जुने वापरते अज्ञात आरोपीने स्वता:चा आर्थिक फायदाकरीता चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता मो.क्र. ९५११२४७२६१ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मनसर येथे दिनांक ०१/०८/२०२२ चे २०.३० वा. सुमारास जखमी कुणाल भयालाल ठाकरे, वय २५ वर्ष, रा. मनसर व आरोपी नामे– सागर राउत, वय २५ वर्ष, रा. मनसर हे ऐकमेकांचे मित्र असून फिर्यादी नामे– अक्षय श्रावन कोल्हे, वय २० वर्ष, रा. हेटी ता. पारशिवनी हा त्याचे मित्रा सोबत गप्पा गोष्टी करीत बसला असतांना आरोपीने दुपारच्या चायनीज चा दुकानात झालेल्या झागडा–भांडण मध्ये जखमी यास 'तु झगडा भांडणामध्ये दुकानदारा कडुन का बोलत होता, माझे बाजुने का बोलला नाही' याकारणावरून त्यास शिवीगाळ करून लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जखमी केले. तसेच जखमीला मारत असतांना तोच लोखंडी रॉड फिर्यादीचे उजव्या कपाळावर लागल्याने फियादी सुध्दा जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो. नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## अपहार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा निर्मल उज्वल सोसायटी कळमेश्वर येथे दिनांक १४/१२/२०२० ते ऑक्टोबर २०२१ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान आरोपी नामे– रमेश भिमराव धरवाल, रा. सोनेगाव याने कर्जदार खातेधारक यांच्याकडुन कर्जाची वसुली करून निर्मल उज्वल सोसायटीमध्ये जमा करण्याचे मालमत्तेचे हुकुमत सोपाविण्यात आलेली असतांना त्याने आपण कर्मचारी एजेंट असलेल्या निर्मल उज्वल सोसायटी येथिल असणाऱ्या ३८ कर्जदार खातेधारक यांची वसुल केलेली एकुण १,४६,८२६/–रूपये रक्कम हि जमा न केलेली अफरातफर केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि गायकवाड मोनं ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १४ कि.मी अंतरावरील मौजा गोंडखैरी शिवार येथे मार्च २०२२ ते ०६ जुन २०२२ चे १२.०० वा. दरम्यान आरोपी क्र. १) गुरुदेव बगमारे, रा. गोंडखैरी व २) धनराज चौधरी रा. दत्तवाडी नागपुर यांनी मार्च २०२२ पासून टेल्मा एच कंपनीचा प्रोडक्टचा माल स्टोअरमध्ये आणला होता. तेव्हा पासून ०६ जून २०२२ रोजी स्टॉक घेण्यासाठी धनराज चौधरी गेले असता स्टॉक कमी असल्याचे त्यानेच फिर्यादी नामे– कमलेश शामलाल सकलानी वय ४० वर्ष रा. प्लॉट नं २९४ गजानन सोसायटी दत्तवाडी यांना निर्दशनास आणून दिले. फिर्यादीच्या पारीख इंटरप्रायझेस कंपनीतील स्टोअरमध्ये येणारा सर्व माल हा काळजीपूर्वक मोजून उतरविणे. तसेच त्या मालाची देखरेख ठेवणे ही सर्व कामे मुख्य स्टोअर इंचार्ज आरोपी क्र. १) गुरुदेव बगमारे व तिथेच काम करणारे आरोपी क्र. २) धनराज चौधरी यांच्यावर मालाची जबाबदारी देण्यात आली होती. फिर्यादीच्या स्टोअरमध्ये असणारा सर्व माल हा वरील दोघांच्या जबाबदारीवर प्रामाणिकपणे सोपविण्यात आला होता. परंतू त्यांनी सदर मालाची काळजी न घेता त्यातील त्यांच्या ताब्यामध्ये असणारा टेल्मा एवं प्रोडक्ट चे १० बॉक्स ची किंमत ५,४६,७५०/–रुपये आणि इतर ०८ बॉक्स ची किंमत १,५६,१८९/–रुपये असा एकुण कि. ७,०२,९३९/–रुपये किमतीचा मालाचा अपहार केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४०८, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि गायकवाड मोनं ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. काटोल** – दिनांक ०१/०८/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री बोळगिर मो.क्र. ९८३४२१९३०९ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत काचुरवाही येथे दि. ०२/०८/२०२२ चे १३.०० ते १३.३० वा. सुमारास **विश्वनाथ टिकाराम मोहणकर (मृतक), वय ५० वर्ष रा. काचुरवाही** हा गावातल्या तलावात अंघोळ करण्याकरीता गेला असता पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– काशीराम टिकाराम मोहणकर, वय ५५ वर्ष रा. काचुरवाही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार सुरेश घुर्वे मो. नं. ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा नांदागोमुख येथे दि. ०२/०८/२०२२ चे ०८. ०० वा. ते १०.३० वा. सुमारास **फनिंद्र खेमराज मिलमिले(मृतक), वय ५० वर्ष रा. वार्ड नं ०३, नांदागोमुख तह. सावनेर जि. नागपूर** याने त्याचे शेतातील कापसाचे पीक (पराटी) जास्त पाऊस झाल्याने पाण्यात बुडाल्यामुळे त्याने टेंशन घेवुन विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती बिघडल्यामुळे फिर्यादी हिने सावनेर येथील शासकिय रुग्णालयात उपचारकामी आणले असता उपचारा दरम्यान तेथील डॉक्टारांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– **संगीता फनिंद्र मिलमिले, वय ३५ वर्ष रा. वार्ड नं ०३, नांदागोमुख तह. सावनेर जि. नागपूर** यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास श्रेणी पोउपनि कामठे मो.क्र. ८४१२०२७०७५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर